**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ०९/२०१५** **दि. २१.०२.२०१५**

| | |
|---|---|
| **मधुकर दाजी राजम**<br>**पवनचक्कीजवळ,**<br>**मु.पो. देवगड**<br>**ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय कणकवली** | **विरुध्द पक्षकार** |

| | |
|---|---|
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. व्ही. बी. जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

श्री मधुकर दाजी राजम पवनचक्कीजवळ, मु.पो. देवगड,जि.सिंधुदुर्ग यांना त्यांच्या रहात्या घराच्या वीज मीटरचे माहे डिसेंबर २०१४ चे वीज बील अवास्तव आले होते. त्याच बरोबर त्याना वीजपुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीसही देण्यात आली होती त्यामुळे श्री राजम यानी या मंचाकडे दि.२१.०२.२०१५ रोजी फॉर्म 'अ' मध्ये थेट तक्रार दाखल केलेली आहे. तक्रार दाखल होताच या मंचाकडील पत्र क्र.३७ दि.२४.०२.२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता कणकवली यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले होते.

दरम्यानच्या काळात महावितरणकडून सदर तक्रारदाराच्या तक्रारीचे निवारण झालेले असून त्यांच्या वीज बीलामध्ये योग्य ती दुरुस्ती महावितरणकडून करण्यात आलेली आहे. याबाबत तक्रारदार श्री मधुकर दाजी राजम यानी दि.०३ मार्च २०१५ रोजी या मंचाकडे लेखी निवेदन देऊन याची कल्पना दिलेली असून त्याच निवेदनाव्दारे त्यानी मंचाकडे दाखल केलेली तक्रार मागे घेत असल्याबाबत या मंचास कळविलेले आहे. त्यामुळे दि.०३.०३.२०१५ रोजी तक्रारदारानी केलेल्या विनंतीनुसार ग्राहकाची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

# आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री. व्हि.बी.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री.ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- ३१.०३.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**